महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक — १४७७(२)/२०२२/वीस दिनांक - ११ ऑक्टोबर,२०२३

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२२ लेखी परीक्षेच्या निकालाबाबत.**

**संदर्भ :- पूर्व परीक्षा जाहिरात क्र. ०४५/२०२२दिनांक ११ मे, २०२२ व मुख्य परीक्षा अधिसूचना क्र.०९९/२०२२ दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २१, २२ व २३ जानेवारी, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२२ च्या लेखी परीक्षेचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक ११ ऑक्टोबर,२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. उपरोक्त निकालानुसार मुलाखतीसाठी प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्याच्या पृष्ठर्थ मुलाखतीच्या वेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुलाखतीस बोलविण्यात येणार आहे.

३. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुइसार आवश्यक मूळ प्रमाणपत्रांची पूर्तता मुलाखतीचे वेळी न केल्यास, तसेच अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासताना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी, कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. लेखी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांचा मुलाखत कार्यक्रम स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत मुख्य परीक्षेमधून मुलाखतीकरीता अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपुस्तिकेतील गुणांची फेरपडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल आरक्षणाच्या/समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

७. मुलाखतीचा सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर-राजपत्रित परीक्षा )
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.